# प्रकरण - पाचवे

# 'पर्व' मधील मिथकांचे वेगळेपण

* प्रस्तावना
* पर्व मधील जीवनचित्रणाचे निराळेपण
* 'पर्व' मधील वास्तव चिंतन
* कानीन संतती, नियोग प्रथा
* बहुपतीत्त्व आणि बहुपत्नीत्त्व विवाहाची पद्धत
* पडद्याआड लपलेल्या माणसांचा शोध
* युद्धानंतरची भीषणता
* मृत्यूचे विदारक चित्रण
* स्त्रीमनाच्या वेदनेचे चित्रण
* 'पर्व' कादंबरीचे वाङ्मयीन वेगळेपण
    १. 'पर्व' मधून व्यक्त झालेला वाङ्मयीन दृष्टिकोन
    २. महाभारताच्या विशाल पटलावर एकवटलेले आशयसूत्र
    ३. 'पर्व' मधील वातावरणनिर्मिती
    ४. 'पर्व' मधील घटनाप्रसंग
    ५. 'पर्व' मधील संवाद
    ६. 'पर्व' ची निवेदनशैली
* समारोप
* संदर्भसूची

## प्रस्तावना

'पर्व' ही आशयदृष्ट्या आणि पृष्ठ संख्येच्या दृष्टिने आगळी - वेगळी ठरलेली कादंबरी मराठी साहित्यामध्ये आपले वेगळे स्थान निर्माण करते. रूढ पौराणिक कादंबरीतील चित्रणाला धक्के देण्याचे साहस एका कन्नड कादंबरीने केले आहे. ही गोष्ट असामान्यच म्हणावी लागेल. 'पर्व' कादंबरी महाभारत कथेतील युद्ध केंद्रवती घेऊन निर्माण झाली आहे. महाभारतात चित्रित झालेल्या कथा या आपल्या सारख्याच सर्वसामान्य माणसांच्या कथा आहेत. मात्र त्यावर आधारित अनेक कथा या दैवी कथा म्हणूनच पुढे आल्या आहेत. दैवी कथांचे कवच बाजूला सारून त्यातील निखळ वास्तवता काय आहे किंवा कशी असू शकेल हे मराठी साहित्यात अगदी कमी प्रमाणात टिपले गेले आहे. पुराणांचे स्वरूप प्राप्त झालेल्या या कथा वास्तव पातळीवर आणून त्याचा सामाजिक अन्वयार्थ शोधता येतो. हे तत्त्व काही कादंबऱ्यामध्ये दिसून येते. आणि हेच तत्त्व कन्नड साहित्यातील एस. एल. भैरप्पा यांनी स्वीकारले आहे. भैरप्पांनी रूढ कथानकाला बाजूला सारून त्यातील कल्पिताला वास्तवाचा आधार देवून, एक सामाजिक अन्वयार्थ लावला आहे. हेच या 'पर्व' कादंबरीचे महत्त्वाचे वैशिष्टये आहे.

प्रस्तुत प्रकरणामध्ये भैरप्पा यांनी 'पर्व' कादंबरीमध्ये मिथकांचा नवा अन्वयार्थ लावला आहे. या वेगळेपणाचा अभ्यास येथे करावयाचा आहे.

## 'पर्व' मधील जीवनचित्रणाचे निराळेपणे

भैरप्पा यांनी महाभारतकालीन समाजजीवनाचे वास्तव रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. 'पर्व' कादंबरीचा विकास साधताना भैरप्पांनी तत्कालीन जीवनपद्धतीचे चित्रण केले आहे. महाभारतकालीन कुरू, मद्र, पांचाल, गांधार, भोज, यादव, हस्तिनावती अशा कितीतरी देशातील क्षत्रिय आर्य जीवनपद्धतीचे, चालीरीतींचे चित्रण कादंबरीमध्ये आले आहे. या वास्तवाचे भैरप्पा यांनी अगदी सूक्ष्मपणे चित्रण केले आहे. क्षत्रिय आर्य राजे हे भोगविलासी होते. अमर्याद स्त्री सुखाच्या जोडील प्रत्येकजण द्युत, जुगार यामध्ये गुरफटलेले दिसतात. किंबहुना सर्व राजकर्तव्ये खुंटीला टांगून

यामध्ये स्वत:ला सर्वार्थाने गाडून घेत असत.

देवलोकाची रूढ असलेली कल्पना म्हणजे स्वर्ग. ही कल्पना टाळून हिमालयामध्ये असलेला एक विशिष्ट प्रदेश म्हणजेच देवलोक अशी भैरप्पांनी कल्पना केली आहे. त्यांच्या प्रथा, रूढी, आहार यांचे सूक्ष्मपणे चित्रण भैरप्पांनी केले आहे. त्या समाजामधील अनेक प्रथा, परंपरा या वेगळ्या असलेल्या पहावयास मिळतात. त्यांच्या मध्ये रूढ असणारी बहुपतीत्त्वाची पद्धत मात्र काहीशी वेगळी वाटते. यासंबंधीचे चित्रण हे वाचकाला विचार करायला भाग पाडते. यातूनच भैरप्पांच्या लेखनाचे सामर्थ्य स्पष्ट होते.

तत्कालीन जीवनपद्धती बरोबर वास्तवाचे नवे आकलन कादंबरी प्रस्तुत करते. 'पर्व' मधील जीवनदृष्टीचा विचार करताना तिच्या वेगळेपणाचा आणखी एक विषय म्हणजे देव मानलेल्या महाभारतातील व्यक्तिरेखा. या सामान्य माणसासारख्या हाडामासाच्या, जमीनीवर उभ्या असलेल्या सर्वसामान्य व्यक्तीच होत्या. पांडव जन्माचे आणि कर्ण जन्माचे रहस्य, शंभर कौरवांच्या जन्माचे रहस्य, वस्त्रहरणाचे प्रसंग उलगडून दाखविण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न केलेला आहे. आजवर मराठी साहित्यामध्ये निर्माण झालेल्या कलाकृतीमधील दैवी पुटं. चढवलेल्या व्यक्तिरेखा या क्षणार्धात मानवीपातळीवर उतरताना दिसतात. हे 'पर्व' मधील चित्रण वाचकांना विचार करायला प्रवृत्त करते.

मानवाची परात्मता किंवा अस्तित्वाची जाणीव, धर्म - अधर्म, न्याय - अन्याय, हेच सूत्र 'पर्व' कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. पण पारंपरिक अर्थाने 'पर्व' वास्तववादी ठरत नाही, तरीही पूर्वीच्या पौराणिक कादंबरीपेक्षा मानवी जीवनवास्तवाला आणि मानवी जीवनसत्याला ती अधिक व्यापकपणे आणि सखोलपणे भिडली आहे.

### 'पर्व' मधील वास्तव चिंतन

रूढ कथानकाला सर्वस्वी बाजूला करून भैरप्पा यांनी महाभारत कथेला नवा अन्वयार्थ प्राप्त करून दिला आहे. महाभारतकालीन वास्तवाचा कादंबरीरूपाने घेतलेला

वेध या दृष्टिने 'पर्व' महत्त्वपूर्ण ठरली आहे. 'पर्व' मध्ये आलेले चिंतन रूढ भूमिकांविरोधी जाणारे आहे. व्यासांनी लिहिलेल्या महाभारत कथेला वाङ्मयीन प्रवाहामध्ये दैवीपनाची धूसरता प्राप्त झाली आहे. महाभारत हा विषय हा इतका व्यापक आहे, हे अनेक वाङ्मयकृतीद्वारे प्रत्ययास येते. पण या लेखनामध्ये अनेक चमत्कार आलेले आहेत. यामध्ये तत्कालीन समाजचित्रण, वातावरणनिर्मिती, कृष्ण, पांडव, द्रौपदी, कुंती, कर्ण या सर्व व्यक्तिरेखा दैवी मानल्या आहेत अशी भूमिका दिसते. यावरून असे दिसून येते की, संपूर्ण महाभारत कथेवर चमत्काराची, दैवीवलयाची छाया पसरलेली आहे.

रूढ कथानकात प्रखरतेने जाणवणारा भाग म्हणजे चमत्कार हा आहे. या चमत्काराचे महाभारत कथेत स्वरूप वेगवेगळे आहे. पुष्कळसे चमत्कार हे 'वर' आणि 'शाप' म्हणून आले आहेत. बरेच चमत्कार हे सत्यघटना पुढे येऊ न देण्याच्या भूमिकेतून साकार झाले आहेत. उदा. पांडवांच्या जन्माची रूढ असलेली कथा. ही कथा म्हणजे, पांडवांचा जन्म दुर्वासऋषीने कुंतीच्या सेवेवर प्रसन्न होऊन दिलेला मंत्र. आणि या मंत्राचा वापर केल्याने कुंतीला झालेली मुले, व तो मंत्र पांडूच्या सांगण्यावरून माद्रीला दिल्याने तिलाही झालेली मुले. ही कथा रूढ कथानकात आलेली आहे. कित्येक चमत्कार ईश्वरी सामर्थ्य म्हणून जनमानसांच्या मनावर बिंबविण्यासाठी महाभारत कथेमध्ये प्रकट झाले आहेत. द्युतसभेच्या वेळी कृष्णाने द्रौपदीला अदृश्यपणे केलेला वस्त्राचा पुरवठा हाही महत्त्वाचा चमत्कार म्हणता येईल. असे अनेक चमत्कार साहित्यिकांनी आपल्या सोईसाठी निर्माण करून ते महाभारत आधारित साहित्यामध्ये रूढ केले आहेत.

या परंपरागत कथानकापेक्षा 'पर्व' चे कथानक सहाजिकच वेगळे ठरले आहे. कादंबरीमध्ये कोठेही चमत्कारिकता, शाप , वर यांचा वापर केलेला आढळत नाही. तर या मागचे सत्य शोधण्याचा प्रयत्न येथे झाला आहे. पांडव जन्माचे रहस्य आणि कर्ण जन्माचे रहस्य 'पर्व' मध्ये भैरप्पांनी अगदी शांतपणे उलगडलेले आहे. कानीन संतती आणि नियोग पद्धतीच्या आधारे जन्मलेली मुले हे सत्य भैरप्पा सांगतात. द्युतप्रसंगातील वस्त्रहरणाची घटना मात्र 'पर्व' मध्ये कोठेच येत नाही.

जयद्रथ वधाचा प्रसंगही अनेक ठिकाणी वेगवेगळ्या पद्धतीने आलेला आहे.

जयद्रथाच्या वधाची रूढ असणारी कथा म्हणजे, सुर्यास्त होण्याअगोदर जयद्रथाला ठार करेन अशी अर्जुनाची शपथ आहे. पण सूर्य अस्ताला अगदी थोडा वेळ राहिला असतानाही जयद्रथ युद्धभूमीवर दृष्टीस पडत नाही. म्हणून कृष्ण आपल्या चमत्काराने सूर्यावर आच्छादन घालतो (सुदर्शन चक्र सोडून सूर्य झाकतो) आणि सूर्यास्त झाला असे समजून क्षणार्धात जयद्रथाच्या गळ्याचा अर्जुनाने वेध घेतो. व नंतर कृष्णाने सूर्यावरील आवरण बाजूला सारले. म्हणजे सूर्य अस्त होण्याअगोदर जयद्रथाला ठार केले. अशी रूढ कथा असलेली दिसते. पण हा प्रसंग 'पर्व' मध्ये मात्र आपले वेगळेपण सिद्ध करतो आहे. अर्जुनाच्या प्रतिज्ञे नंतर जयद्रथाच्या संरक्षणासाठी चक्र - शक्रट - व्यूह याची रचना केली आहे. जिथे इंद्रालाही पोहचने शक्य नाही अशी रचना केली आहे. सूर्यास्त होण्याची वेळ झाली तरीही जयद्रथ दृष्टीस पडत नाही. म्हणून संध्याकाळ झाली युद्ध थांबवावे असे उद्गार काढल्याने सैन्यामध्ये सुटकेचा नि:श्वास पसरलेला आहे. आजच्या दिवसाचे युद्ध थांबले म्हणून, आणि अर्जुन स्वत: अग्निकुंडामध्ये प्रवेश करणार असा दुहेरी आनंद सैन्यामध्ये परसलेला आहे. या प्रसंगाचे भैरप्पांनी केलेले वर्णन हे अर्जुनच्या चातुर्याची जाणीव करून देते, ''अखेर युद्ध थांबलं, आता अर्जुनाला हिणवणं एवढंच राहिलं होते, दुर्योधन महाराजानं जयद्रथाला आपल्या रथात घेतलं आणि दूर राहून ओरडला, 'अरे अर्जुना ! हा पहा इथं जयद्रथ आहे ! तुला अग्निकुंड आम्ही सज्ज करून द्यावं, की तुचं करून घेशील ? आणि डोळ्याचं पातं लवण्याआधी अर्जुनाच्या बाणानं जयद्रथाच्या गळ्याचा वेध घेतला !...... आणि अर्जुनाचा सारथी कृष्ण उंच आवाजात सांगत होता, ''दुर्योधना अजूनही सूर्य मावळला नाही, तो पहा!''[१] हा प्रसंग मूळ महाभारत कथेतील प्रसंगापेक्षा वास्तवाच्या अधिक जवळ जाणारा आहे.

भैरप्पा यांनी 'पर्व' मध्ये चित्रित केलेले घटना प्रसंग हे, रूढ साहित्यातील घटना प्रसंगापेक्षा वेगळे आणि वास्तव सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

**कानीन संतती, नियोग प्रथा**

तत्कालीन समाजामध्ये कानीन संतती, नियोग प्रथा अस्तित्वात होत्या हे दिसून येते. त्याच प्रथा महाभारत कथेमधेही आलेल्या दिसतात. हिच पार्श्वभूमी घेऊन 'पर्व' मध्ये भैरप्पांनी या प्रथा रेखाटल्या आहेत. आजही ह्या प्रथा हिमालयाच्या काही भागात अस्तित्वात असलेल्या पहावयास मिळतात. म्हणजेच हिमालयाच्या पायथ्याशी असलेले त्यांचे अस्तित्व जणू काही तिथल्या समाजांनी आजही टिकवले आहे असे वाटते.

कानीन संतती ही प्रथा 'पर्व' मध्ये आलेली आहे. याची अनेक उदाहरणे कादंबरीमध्ये पहावयास मिळतात. व्यासासारख्या व्यक्तिरेखा कानीन संतती म्हणून आपल्यासमोर येतात. व्यास हा सत्यवतीचा कानीन पुत्र आहे. पराशर ऋषी आणि धीवरकन्या (मत्स्यगंधा) यांच्या समागमातून जन्माला आलेला व्यास. शिवाय कुंतीचा पुत्र कर्ण. हा देखील कानीनच आहे. कुंतीभोज राजाच्या घरी दुर्वास ऋषी आले असता त्यांची सेवा करण्याचे काम राजकन्येने करणे श्रेष्ठ मानले जात होते. दुर्वास ऋषीची सेवा करताना कुंतीने, "बाळ कसं जन्माला येत?."[२] हा जिज्ञासेपोटी विचारलेला प्रश्न आणि या प्रश्नाची पूर्तता म्हणून दुर्वास ऋषीच्या पासून झालेला कर्ण हे सत्य भैरप्पा स्पष्ट करतात.

या प्रथेबरोबरच नियोगाचीही प्रथा 'पर्व' मध्ये आलेली दिसते. कुरूवंशाची वृद्धी होण्यासाठी नियोग पद्धतीचा अवलंब सुरूपातीपासूनच केला आहे. महाभारत युद्ध घडलेले या नियोग पद्धतीमुळे असे म्हटले तरी काही वावगे ठरणार नाही. नियोगाच्या आधारे अंबिका, अंबालिका यांना पुत्र प्राप्ती व्हावी असे सत्यवतीला वाटते. कुरूवंशाची वृद्धी होणे गरजेचे असल्याने नियोगासाठी सत्यवतीचा कानीन पुत्र कृष्णद्वैपायन व्यास याला बोलावले जाते. त्याच्यापासून अंबिकेला धृतराष्ट्र, अंबालिकेला पांडू आणि या दोघीची दासी हिला विदूर ही नियोग पद्धतीच्या आधारे मुले जन्माला आली आहेत.

पुढे याच पद्धतीचा अवलंब कुंती आणि माद्री यांनी केला आहे. हस्तिनावतीचे राज्य आपल्याच मुलांना मिळावे ही इच्छा असल्याने आणि कुरूवंशाचा प्रश्न पुन्हा

निर्माण झाल्याने, पौरूष्यहिन पांडू कुंतीला आणि माद्रीला नियोग पद्धतीने वंश वाढविण्याचे सुचवितो. या नियोगातून कुंतीला 'यमधर्म', 'मरूत', 'इंद्र' यांच्यापासून 'धर्मराज', 'भीम', 'अर्जुन' ही तीन मुले झाली. आणि माद्रीला अश्निकुमारांपासून 'नकूल' आणि 'सहदेव' जन्माला आली आहेत.

या प्रथांच्या संदर्भात रवींद्र ठाकूर यांचे मत लक्षणीय ठरते, ''कर्ण हा कुंतीचा कानीन पुत्र होता, हे वास्तव आहे. महाभारतकाळी आणि त्यापूर्वीही आर्य जमातीमध्ये नियोगाची प्रथा अस्तित्वात होती. आणि धृतराष्ट्र, पांडू, विदूर यांचा जन्म या प्रथेनुसार व्यासांकरवी झाला आहे. हे सर्वमान्य सत्य आहे. बहुपतीत्त्वाची प्रथा किंवा कानीन संततीची प्रथा ही या काळात रूढ असेल तर ती विवाहपूर्वी आपत्य जन्माला देऊ शकत असे. विवाहापूर्वी स्त्रीला होणारी संतती कानीन संतती मानली जात असे. व तिच्या विवाहानंतर संतती तिच्या पतीची मानली जात असे. कदाचित विवाह संस्था अजून पूर्णपणे अस्तित्वात आली नसावी तेव्हाचा हा काळ असावा. उपरोक्त प्रथा एनद्रशीय जमातीमध्ये होत्या तशा त्या आर्य जमातीमध्येही होत्या.'' [३]

अशा या अलीकडच्या काळात न पटणाऱ्या प्रथा, पद्धती महाभारतकाळामध्ये अस्तित्वात होत्या याची कल्पना 'पर्व' च्या आधारे येते.

## बहुपतीत्त्व आणि बहुपत्नीत्त्व विवाहाची पद्धत

महाभारत काळामध्ये बहुपतीत्त्व आणि बहुपत्नीत्त्व या प्रथा अस्तित्वात होत्या. हे 'पर्व' कादंबरीतून दिसून येते. आपल्याकडे बहुपत्नीत्त्व ही प्रथा पहावयास मिळते पण बहुपतीत्त्वाची पद्धत मात्र काहीशी वेगळीच वाटते. बहुपत्नीत्त्वाची उदाहरणे 'पर्व' मध्ये आलेली दिसतात. ती शंतनूचा गंगा आणि सत्यवतीशी झालेला विवाह, पांडूचा कुंती आणि माद्रीशी झालेला विवाह, भीमाचा सालकटंकटी आणि द्रौपदीशी झालेला विवाह, अर्जुनाचा द्रौपदी, उलुपी, चित्रांगदा, सुभद्रा यांच्याशी झालेला विवाह अशी उदाहरणे 'पर्व' मध्ये आणि महाभारतामध्येही पहावयास मिळतात.

महाभारतामध्ये आणि 'पर्व' या कादंबरीमध्ये बहुपत्नीत्त्वाची अनेक उदाहरणे

आहेत पण बहुपतीत्त्वाची पद्धत मात्र फक्त द्रौपदीच्या बाबतीत घडल्याचे दिसून येते. बहुपतीत्त्वाची प्रथा आजही हिमालयाच्या पायथ्याशी अस्तित्वात आहे असे स्वत: भैरप्पा यांनी नमूद केले आहे. या प्रथेचे वर्णन भैरप्पांची कुंती करते, (देवलोकात) ''त्यांच्यात एकूण बत्तीस गण असतात म्हणे. प्रत्येक गणातले सगळे स्त्री-पुरूष एकमेकांचे पती - पत्नी असल्याप्रमाणे राहतात, असंही समजलं, एका गणातील स्त्री त्या गणातल्या कुणाही पुरूषाबरोबर एकरूप होऊ शकते. अशा वेळी नकार द्यायची पद्धत तिथे नाही, म्हणे. स्त्री - पुरूष दोघांनाही समान अधिकार, जन्मलेली मुलं संपूर्ण त्या गणाची. स्त्री पुरूषांत एकमेकाविषयी संकोच नाही, की लज्जा नाही. कुणी तसा भेद करत नाही कुणी तसा भेद केलाच तर गणप्रमुख त्याला शिक्षा करतो.''[४] ही प्रथा आजही अस्तित्वात असलेली दिसून येते.

याशिवाय आणखी एक पद्धत कुंती सांगते, एका कुटुंबातल्या भावडांनी एकाचवेळी लग्न करायचं ते दोन - तीन बायकांशी आणि त्या सगळ्या त्या भावांच्याच बायका म्हणून ओळखल्या जात आणि त्यांना मुले झाली की, सर्वांत थोरल्या भावाचे नाव लावले जाते. अशीही पद्धती देवलोकात अस्तित्वात असलेली दिसून येते. याच पार्श्वभूमीवर द्रौपदीचा विवाह कुंती 'धर्म', 'भीम', 'अर्जून' आणि 'नकूल', 'सहदेव' यांच्याशी करून देते. आणि त्यांच्या पासून होणारी संतती ही थोरल्याच्या म्हणजेच धर्मराजाच्या नावाने ओळखली गेली. ही पद्धत आर्येत्तर समाजातही तत्काळात प्रचलित होती असा उल्लेख 'पर्व' मध्ये येतो. हेच वास्तव भैरप्पा 'पर्व' मध्ये रेखाटतात.

### पडद्याआड लपलेल्या माणसांचा शोध

भैरप्पा यांनी 'पर्व' कादंबरीमध्ये पडद्याआड लपलेल्या मानवी मनाचा वेध प्रखरतेने घेण्याचा प्रयत्न केला आहे. मूळ व्यासांनी रेखाटलेल्या व्यक्तिरेखांचे पाय जमीनीवर असले तरी त्या व्यक्तिरेखांवर चमत्कारिक कथांची अनेक पुटे चढलेली / चढवलेली पहायला मिळतात. भारतीय संस्कृतीचे दिव्यपन नाकारून भैरप्पांनी दैवी, शाप, वर, चमत्कार या भक्कम पडद्याआड लपलेल्या माणसांचा शोध 'पर्व' मधून

घेतला आहे.

महाभारत कथेमध्ये कृष्ण ही व्यक्तिरेखा परमेश्वराचा अवतार म्हणून आपल्यासमोर आली आहे. ती विष्णूचा अवतार मानली जाते. पण या पाठीमागे लपलेला हडामासाचा माणूस भैरप्पा कादंबरीमध्ये उभा करतात. असामान्य ठरलेल्या व्यक्ती सामान्यपणे 'पर्व' मध्ये साकार झाल्या आहेत.

पद्माकर दादेगावकर यांच्या मते, ''कुंतीचा ज्यांच्याशी नियोग झाला ते यमधर्म, मरूत वा इंद्र हे हिमालयाच्या आतल्या भागात वस्ती करून राहणाऱ्या व आर्यांचे मूळ वंशज असलेल्या देवनामक समाजातील प्रमुख पुरूष आहेत. असे सांगून भैरप्पा 'पांडवांमध्ये देवत्वाचा अंश होता' या मिथ चे सर्वप्रथम उच्चाटन करतात.''[५]

'पर्व' मधून येणाऱ्या देवदेवता या स्वर्गातून येत नाहीत. तर त्या हिमालयाच्या थंड प्रदेशातील एका भिन्न संस्कृतीचे लोक आहेत हे भैरप्पा स्पष्ट करतात. या संदर्भात सौ. तुकदेव म्हणतात, ''पर्व' मधील घटना प्रसंगाची निवड, व्यक्तिरेखा आणि तंत्र या तिन्ही घटकांचा विचार केला तर असं दिसून येतं की महाभारतातील घटनामधील अद्भुताच्या पडद्याआड काय आहे? हे शोधण्याचा प्रयत्न हा 'पर्व' चा प्रेरक हेतू आहे. ह्या हेतू मुळे 'पर्व' ला कलाकृतीच, कादंबरीचं किंवा नव निर्मितीचं रूप प्राप्त होण्याएवजी अकलनाचं व शोधाचं रूप प्राप्त झालेलं आहे.''[६]

अशा असंख्य व्यक्तिरेखा पडद्याआडच्या जीवनातून आपल्यासमोर स्पष्टपणे उभ्या केल्या आहेत. मूळ महाभारत कथाच असंख्य व्यक्तिरेखांनी एकत्र केली आहे. कल्पिताला बाजूला करून पडदयाआडच्या सूत्रधाराला रंगमंचावर आणून त्यावर प्रखर प्रकाश भैरप्पांनी टाकला आहे.

### युध्दानंतरची भीषणता

भैरप्पा यांनी 'पर्व' कादंबरीमध्ये चित्रित केलेली युद्धानंतरची भीषण अवस्था ही मिथकाला सर्वर्थाने बाजूला करून लिहिली आहे. 'पर्व' कादंबरीच्या शेवटच्या प्रकरणात युद्धाची भीषणता आणि त्याचे उमटलेले पडसाद याचे चित्रण आले आहे.

'पर्व' मध्ये युद्धाचे चित्रण करणारा तेरावा भाग सर्व प्रकारांनी वेगळा ठरलेला आहे. आणि युद्धा नंतरची भीषण अवस्था ही चौदाव्या भागामध्ये दिसून येते. हे शेवटचे प्रकरण अगदी मोजक्याच वर्णनात निर्माण केलेले आहे.

सुप्रिया सहस्त्रबुद्धे यांनी याचे केलेले वर्णन, ''पर्व' च्या शेवटी पावसाचे तांडव चालू आहे. युद्धामुळे धनधान्याची भांडारे रिकामी झाली आहेत. अरण्याला वनवा लागला आहे. युद्धाच्या काळात खेडी लुटली गेली असल्यामुळे ग्रामप्रमुखांनी असहकार पुकारला आहे. ते कर द्यायला तयार नाहीत. भीमाचा मुलगा घटत्कोच याचे साथी राक्षस परत अरण्यात गेले, तेव्हा त्याची अरण्ये आर्यजनांनी जाळून टाकल्याचे दिसले आहे. शिकारीसाठी हरणे जिवंत नाहीत. सरोवरातल्या पाण्यात राख भरून राहिली आहे. मुसळे, पहारी, तलवारी, कुऱ्हाडी मिळेल त्या शस्त्रांनी आपापसात लढून यादव मरण पावले आहेत. नदीच्या प्रवाहात बायकांची प्रेते वाहत आहेत, पेरणीसाटी माणसे आली की, त्यांना मारून रक्तमांस खाऊन जगायचे असे काही खेड्यातल्या लोकांनी ठरवले आहे. सैनिकांच्या मनोरंजनासाठी युद्धभूमीवर नेलेल्यांपैकी हजारो बायका गर्भवती आहेत. या हिंसेच्या गर्भांना नावे कुणाची लावायची हा त्यांचा प्रश्न आहे. उत्तरेचे मुल मेलेले जन्माला आलेले आहे. कुंती द्रौपदीला नियोगाची ताकीद देते आहे. द्रौपदी जळजळीत उत्तर देते. समुद्राच्या उधाणाला सामोरी जाणाऱ्या द्वारकेकडे कृष्ण दिङ्मूढपणे पाहत आहे. युद्धोत्तर चौफेर विनाशाच्या या उद्ध्वस्त चित्रापाशी 'पर्व' संपते आहे. लोहारच्या घरात मुल जन्माला आले आहे, हे नव्या युगाच्या सृजनाचं प्रतीक आहे. पण विनाशाचा गदारोळ आणि आक्रोश अधिक मोठा आहे.''[१] या विनाशकारी चित्रणावर 'पर्व' संपते आहे.

'पर्व' मध्ये आलेले धर्म - अधर्म, नियोग योग्य की अयोग्य? मुलं बिजाची की क्षेत्राची? या सारख्या असंख्य प्रश्नांना उभारी दिली आहे. आणि शेवट मात्र विनाशकारी घटनेवर भैरप्पांनी केला आहे. धर्माचा चौकस व्यासांग असलेला धर्मराजा शेवटी सर्व बाजूनी पराभूत झालेला आहे. 'पर्व' चे शेवटचे वाक्य हे या सर्व संहाराची खोली जाणवून देते, ''राजभवनात भरून राहिलेल्या बायकांना काय उत्तर द्यायचं, ते न समजून

धर्मराजा बाहेरच्या पावसाकडे एक टक पाहत बसतो.''[८]

असा कादंबरीचा शेवट संहारावर केला आहे. विजय प्राप्त होऊनही पराजित झालेल्या युद्धाचे विनाशकारी चित्रण भैरप्पांनी 'पर्व' या कादंबरीमध्ये केले आहे.

## 'पर्व' मधील मृत्यूचे विदारक चित्रण

'पर्व' मध्ये मृत्यूचे चित्रण भैरप्पांनी शेवटच्या दोन खंडात केलेले आहे. मूळ महाभारत कथेमध्ये आलेले मृत्यूचे चित्रण हे त्याच पार्श्वभूमीवर तितक्याच जोमाने भैरप्पांनी रेखाटण्याचा प्रयत्न केलेला आहे. बाराव्या भागामध्ये मृत्यूची छाया पसरलेली दिसते. युद्धाची भीषणता जाणून घेऊन होणाऱ्या संहाराचे चित्र अगोदरच भीष्माच्या समोर उभे राहते.

कृष्णद्वैपायनाच्या मुलाचा मृत्यू आणि आग्नि दिल्यानंतर येणारा वास संपूर्ण आश्रमात पसरलेला आहे. याचा भीष्माच्या मनावर झालेला परिणाम अगदी सूक्ष्मपणे टिपले आहे. मृत्यूची भयानक शांतता आणि मृत्यूची भीती याचे वातावरण भैरप्पांनी भीष्माच्या भोवती निर्माण केले आहे. याचे वर्णन, ''संपूर्ण आश्रमात अंधार पसरला होता जवळ जळणाऱ्या चितेतून उठणारा धूर आणि वास यामुळे सुतकाच वातावरण पाचेंद्रियांना स्पर्श करत होते. भीष्माच्या मनातही मृत्यूसारखीच भीती भरून राहिली होती.''[९] मृत्यूचा येणारा वास आणि मन व्यापून टाकणारी असाहाय्य भावना यातून व्यक्त होते आहे.

तेराव्या भागामध्ये युद्धभूमीवरील मृत्यूचे चित्रण अगदी मोजक्याच शब्दात आले आहे. युद्ध निश्चिती आणि त्यामुळे होणारा संहार याची कल्पना प्रथम आली ती भीष्मांना. म्हणूनच युद्धाची समेट घडविण्यासाठी दुर्योधनाच्या सैन्याचे सेनापती पदन स्वीकारून युद्ध करतात. पण भीष्म युद्धातून माघार घेतात व सेनापती पदाचा त्याग करून देहत्याग करण्याचे ठरवतात. तेव्हा स्वत: भीष्म मृत्यूचे वर्णन करतो, ''जेव्हा जगण्यात अर्थ नाही, तेव्हा मृत्यू म्हणजे काही अर्थ राहत नाही, निराहारी होऊन मृत्यूला भेटण्याशिवाय उत्तम मार्ग अजुन तरी मला समजलेला नाही.''[१०]

भीष्मांना मृत्यूविषयी वाटणारी भीती नाहीशी होऊन मृत्यू हाच सर्वांतून सुटका करण्याचा मार्ग आहे याची जाणीव होते.

युद्धभूमीवरील सर्व हकिकत संजय हा धृतराष्ट्र, गांधारी आणि विदूर यांना सांगत असे. तेव्हा मृत्यूचे विदारक वर्णन करताना, वध, मेले, मरण पावले, कथाच संपली, ठार केले, सूड घेतला, संपवलं, मृत्यू, यमदासी पाठवलं, गतप्राण झाला, वाचला नाही, वीरमरण आले, मुंडक उडवलं असे संजयाने वेगवेगळे शब्द वापरले. म्हणजेच मृत्यू झाला यासाठी भैरप्पांनी वेगवेगळी विशेषणे वापरली आहेत.

युद्धभूमीवर मांडलेले मृत्यूचे थैमान याचे चित्र उभे करण्यासाठी भैरप्पांनी आपल्या लेखनाचे सामर्थ्य पुरेपूर ओतले आहे. युद्धभूमीवरील प्रसंग अत्यंत बारकाईने, सूक्ष्मतेने भैरप्पांनी टिपले आहेत. कादंबरी वाचताना प्रत्यक्ष युद्धाचा प्रसंग समोर उभा करण्याचा प्रयत्न 'पर्व' मध्ये केला आहे.

## स्त्रीमनाच्या वेदनेचे चित्रण

'पर्व' मधील मिथकांचा नवा अन्वयार्थ स्पष्ट करताना एक महत्त्वाचा प्रश्न भैरप्पांनी कादंबरीत मांडला आहे. स्त्रीमनाच्या वेदनेचे चित्रण या प्रश्नावर विशेष भर दिलेला आहे. स्त्रीमनाचा विचार करून एक स्त्री म्हणून तिच्याकडे न पाहता, एक माणूस म्हणून तिच्याकडे भैरप्पांनी पाहिले आहे.

'पर्व' कादंबरीमध्ये स्त्रियांच्या मनाची अनेक द्वंद पहावयास मिळतात. गंगापासून ते उत्तरापर्यंत असंख्य स्त्रिया महाभारतात वेगवेगळी भूमिका घेऊन आल्या आहेत. त्यातीलच काही महत्त्वपूर्ण स्त्री व्यक्तिरेखा आपले अंतर्मन 'पर्व' मध्ये व्यक्त करताना दिसतात.

भैरप्पांनी स्त्रीमनाचे चित्र अत्यंत कलात्मतेने टिपले आहे. 'पर्व' मध्ये भैरप्पांनी कुंती, गांधारी, द्रौपदी, सालकटंकटी आणि उत्तरा या स्त्री व्यक्तिरेखा यांच्या आयुष्याची झालेली परवड विशेष करून टिपण्याचा प्रयत्न केला आहे. 'पर्व' कादंबरीमध्ये अत्यंत दुर्दैवी ठरलेली स्त्री व्यक्तिरेखा म्हणजे कुंतीची असे म्हणावयास हरकत नाही. कादंबरीमध्ये

कुंतीच्या मनाचा सूक्ष्मपणे वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. लग्ना अगोदर कानीन म्हणून जन्माला आलेला कर्ण, तिचा असूनही,तिचा होत नाही. क्षत्रिय असूनही सूतपुत्र म्हणून जगलेला आपला मुलगा सूतपुत्र म्हणूनच मरण स्वीकारतो. या मध्ये कुंतीच्या मनाची झालेली अवस्था भैरप्पांनी टिपली आहे.

लग्ना अगोदर आई होणे हा अपमान समजला जात असल्याने जन्माला आलेलं बाळ तिच्या पासून दूर केले जाते. कानीन संततीची प्रथा तत्काळात असून तिच्या वाट्याला आलेले दु:ख व्यक्त करताना भैरप्पांची कुंती म्हणते, ''मग माझ्याच मुलाला बाबांनी त्या वेळी माझ्यापासून का दूर केलं? त्या वेळी समाजापासून का दूर ठेवलं होतं? सत्यवती कोळी समाजातील होती, म्हणे त्यांच्या समाजात कुठल्या संकोच्या शिवाय कानीन पुत्रासह वधूशी लग्न करण्याची प्रथा आहे. या क्षत्रियांनाच का संकोच वाटावा.''[११] यातून कुंतीच्या मनातील अत्मियता स्पष्ट होते.

लग्नानंतरही कुंतीला पती सुख मिळालं नाही. कितीतरी आत्मवंचना कुंतीने सहन केल्या आहेत. जे सुख अनुभवलं ते सारे कल्पनेच्या विश्वातच असे कुंती सांगते. नियोगाने जन्माला आलेली मुले पांडूची नव्हेत, ती कुंतीची आहेत. सतत होणारा कुंतीची मुले हा उल्लेख यामुळे कुंतीच्या मनावर होणारा आघात भैरप्पा व्यक्त करतात. कुंतीबद्दल सुप्रिया सहस्त्रबुद्धे म्हणतात, ''भारतीय जनमानसाने दु:खाने गांजलेली पण पुत्र कर्तव्याने बांधलेली एक आदर्श माता म्हणून कुंतीकडे पाहिले आहे. कौमार्य अवस्थेत झालेले मूल, त्याचा तिने केलेला त्याग आणि पुढे वैवाहिक जीवनात पतीच्या आज्ञेवरून तिने नियोगाद्वारे केलेली पुत्रप्राप्ती या गोष्टी तिच्या वाट्याला आलेला अटळ देवभोग मानून भारतीय मनाने आणि मराठी लेखकांनीही उदारमनस्कतेच्या अवरणाखाली झाकलेल्याच राहू दिल्या.''[१२]

आयुष्यभर मुलांसाठी जगणारी कुंती, कुरूवंश वाढविण्यासाठी झटणारी कुंती ही शेवटपर्यंत दु:खीच राहिली आहे. पस्तिसाव्या वर्षी वाट्याला आलेले विधवेचे जीवन जगणारी कुंती मुलांसाठीच जगते. कानीन संतती म्हणून वाट्याला आलेला पुत्राचा वियोग सहन करते. द्युतात हरल्यानंतर बारा वर्षे वनवास आणि एका वर्षाचा

अज्ञातवास नशीबी आल्यामुळे मुलांपासून दुरावते. आणि शेवटी कुरूवंशाचा शेवट ही कुंती पाहते. अशी ही 'पर्व' मध्ये आलेली कुंती आयुष्यभर दु:खीच राहिली आहे.

'पर्व' मध्ये द्रौपदी ही सहनशील, संयमी व्यक्तिरेखा भैरप्पांनी रेखाटली आहे. दैवी चमत्कारातून बाहेर काढून एक सर्वसामान्य स्त्री म्हणून द्रौपदी मांडली आहे. आयुष्यभर पाच जणाची शक्ती बनून राहणे आणि त्यांची सेवा करत जगणे एवढेच तिचे आयुष्य बनले आहे. असे वाटते. विवाहाचा पण अर्जुनाने जिंकून सुद्धा द्रौपदीला इतर चार जणांबरोबर विवाह करावा लागतो. अर्जुनावर प्रेम असूनही इतर चौघांशी संग ती सहन करते. द्रौपदी स्वत:साठी न जगता ती पाच जणांसाठीच जगते. वनवास, अज्ञातवास, युद्धाच्या वेळी पाच जणांची प्रेरणा बनून राहते.

द्युतप्रसंगी होणारा अपमान ती सहन करते. पाच जणांनी ठेवलेली वेश्या अशी भर सभेतील होणारी अवहेलना 'द्रौपदी मुकपणे स्वीकारते. वनवास आणि अज्ञातवासाचे जिणे ती सहन करते. विराट राज्यामध्ये विराटराजाच्या राणीची दासी होऊन राहते.

वनवासाला जाताना पाचही मुलांना माहेरी पाठवणारी द्रौपदी तेरा वर्षे मुलांपासून दूर राहते. युध्दात विजय मिळाल्यानंतर क्षणार्धात त्याचे रूपांतर पराजयात होते. ते द्रौपदीच्या पाचही मुलांची झालेली हत्या यामुळे अशी द्रौपदी 'पर्व' मध्ये साकार झाली आहे. पाच जणांनशी विवाह करूनही आयुष्यभर दु:खी राहणारी द्रौपदी सर्वसामान्य स्त्रिया प्रमाणेच रेखाटली आहे.

या स्त्रियांच्या बरोबर 'पर्व' मध्ये गांधारीच्या मनाचाही वेध घेतला आहे. पती अंध आहे हे समजताच आयुष्यभर डोळ्याला पट्टी बांधून अंध होणारी गांधारी भैरप्पांनी रेखाटली आहे. तिच्या पोटी जन्मणारी चौदा मुले तिने न बघताच युद्धामध्ये मरण पावली आहेत. आयुष्यभर दुसऱ्याचा सहारा घेऊन जगणारी दु:खी गांधारी इथे रेखाटली आहे.

सालकटंकटी ही भीमाबरोबर विवाह करून आयुष्यभर वाट्याला आलेला विरह सहन करत जगणारी एक स्त्री भैरप्पांनी 'पर्व' मध्ये साकारली आहे.

उत्तरा ही अभिमन्युची पत्नी. अभिमन्यूच्या मृत्यूनंतर अकाली प्राप्त झालेले

वैधव्य आणि जन्मला येताच मेलेले मुलं या दु:खाच्या उंबरठ्यावर असणारी उत्तरा आपल्या समोर येते.

अशा या व्यक्तिरेखांच्या मनाचा वेध घेण्याचा भैरप्पांचा प्रयत्न दिसून येतो. स्त्रीमनाच्या वेदनेचे अनेक पदर 'पर्व' मध्ये उलगडले आहेत. या स्त्रियाबरोबरच गंगा, सत्यवती, आंबा, अंबिका, अंबालिका, राधा या स्त्रियांच्याही जीवनात अनेक परिने आलेले दु:ख, व्यथा, वेदना मूकपणे सहन करणाऱ्या या व्यक्तिरेखा 'पर्व' मध्ये पहावयास मिळतात. महाभारतकालीन स्त्रियांनी पातिव्रत्य, आचारशील, कुलाचा मान राखायचा परंतु त्यांच्या पतीने मात्र मोकाट वागायचे अशीच काहीशी स्त्री जीवनाची परवड 'पर्व' मध्ये दिसते. भैरप्पांनी स्त्रीमनाच्या व्यथांचे विविध कंगोरे शोधण्याचा प्रयत्न 'पर्व' मध्ये केला आहे.

### 'पर्व' चे वाङ्मयीन वेगळेपण

'पर्व' या कादंबरीने आपले मराठी साहित्यातील वेगळेवपण सिद्ध केले आहे. रूढ मिथकांना बाजू देऊन त्याच मिथकांचा नवा अन्वयार्थ लावण्याचा एक लक्षणीय प्रयत्न 'पर्व' मध्ये दिसून येतो. हे वेगळेपण सिद्ध करताना 'पर्व' वाङ्मयाच्या दृष्टिनेही सर्वस्वी वेगळी ठरलेली कादंबरी आहे असे म्हणता येईल. हेच वाङ्मयीन वेगळेपण पुढील काही मुद्यांच्या आधारे पाहता येईल.

### १) 'पर्व' मधून व्यक्त झालेला वाङ्मयीन दृष्टिकोन

'पर्व' मधून व्यक्त झालेला वाङ्मयीन विचार यातून महाभारताकडे मूलगामी भूमिकेतून पाहता येते. कादंबरीचा आशय, संरचना, भाषा, व्यक्तिचित्रण या बाबत आणि कादंबरीच्या स्वरूपाबद्दल एक वेगळा दृष्टिकोन 'पर्व' निर्मितीमागे होता हे स्पष्ट होते. जीवनाविषयीचे सखोल चिंतन व नवे अवलन 'पर्व' मध्ये व्यक्त झाले आहे. म्हणूनच कन्नड असूनही मराठीमध्ये अनुवाद झाल्यानंतर एक महत्त्वाचा टप्पा व एक बंडखोर कादंबरी म्हणून 'पर्व' ला अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. महाभारत

कथेवर लिहिलेल्या 'ययाती' पासून ते आजवरच्या कादंबरी लेखनापेक्षा 'पर्व' वेगळी ठरली आहे.

'पर्व' कादंबरीच्या वाङ्मयीन संरचनेचा विचार करता असे जाणवते की, पारंपरिक कादंबरी प्रमाणे 'पर्व' ला रूढ कथानक नाही, एकाच परिमानाच्या दिशेने विकसित होत जाणारे कथाबीज असे 'पर्व' चे स्वरूप नाही. कादंबरीत चित्रित झालेली घटना, व्यक्तिरेखा असंख्य आहेत. पण ते एका विशिष्ट कथासूत्राशी कथात्मक अपरिहार्यतेच्या किंवा कार्यकारण भावाच्या संबंधाने घट्ट बांधलेले नाही. तर, 'पर्व' ची संरचना बंदिस्त नसून ती विस्तृत आणि खुली आहे. कादंबरीमध्ये येणाऱ्या घटना, प्रसंगांना आणि व्यक्तिरेखांना अर्थपूर्णता प्राप्त झालेली आहे. आणि त्यातच त्याला आत्मनिवेदनाचा काहीसा घाट प्राप्त झालेला आहे. अशा दृष्टिकोनातून साकार झालेली 'पर्व' ही महाभारतआधारित असलेली कादंबरी सर्वार्थाने वेगळी ठरली आहे.

## २) महाभारताच्या विशालपटलावर एकवटलेले आशयसूत्र

महाभारत हा महाग्रंथ व्यासांनी रचलेला असून त्यामध्ये कितीतरी आशयसूत्रांचा समावेश झालेला आहे. महाभारतामध्ये आलेल्या हजारो व्यक्तिरेखा, वेगवेगळी राज्ये यांचा असलेला समावेश यावरून महाभारताचा पट किती विशाल आहे हे जाणवते. अशा या महाभारत कथेवर आजपर्यंत मराठी साहित्यामध्ये विपुल प्रमाणात लेखन झालेले आहे. कितीतरी कलाकृती वेगवेगळे आशयसूत्र घेऊन आपल्यासमोर आलेल्या दिसतात.

नीती, तत्वज्ञान, अध्यात्म, जीवनदर्शन हे विषय अनेक कलाकृतीतून प्रखरतेने पहावयास मिळतात. अशा या महाभारत कथेचा अभ्यास विविधांगांनी झालेला आहे. भारतीय कथा आणि त्यातील कथाभागाचा नवा अन्वय साधून वि. वा. शिरवाडकर, वसंत कानेटकर, विद्याधर पुंडलिक, शिवाजी सावंत, श्री. वा. किर्लोस्कर इ. नी महाभारत आधारित निर्मिलेल्या नाट्यकृती लक्षणीय ठरल्या आहेत.

कादंबरी लेखनामध्ये महाभारत कथेवर 'ययाती' पासून ते 'मृत्यूंजय' पर्यंत

आणि 'मृत्यूंजय' पासून ते आजवर विविध कथासूत्रांना अनुसरून साहित्य निर्माण झालेले आहे / होत आहे. अलीकडच्या कालखंडामध्ये महाभारतातील पौराणिकता रेखाटताना त्या पौराणिकते मागे असलेले वास्तव चित्रित करण्याचा प्रयत्न दिसून येत आहे.

'पर्व' ही कादंबरी महाभारत कथेतील कथासूत्राला बरोबर घेऊन साकार झाली आहे. 'युद्ध' या घटकेला केंद्रवर्ती ठेवून महाभारताच्या विशाल पटलावर साकारलेली ही कादंबरी भैरप्पांनी समर्पकपणे रेखाटली आहे. वैचारिकतेच्या वेगवेगळ्या वळणावर घेऊन जाणारी ही कादंबरी मराठी साहित्यात बंडखोर ठरली आहे. अनेक तंत्रांना झुगारून देत साकार झालेली ही कन्नड साहित्यकृती मराठीमध्ये विशेष मानली जाते. समाजवास्तवाच्या कक्षेत लेखन केलेली 'पर्व' ही रूढ कथासूत्राला बाजूला सारून लिहिलेली एक विलक्षण कादंबरी ठरते.

'पर्व' या कादंबरीमध्ये भैरप्पांनी मिथकांना स्थान दिलेले नाही पण या मिथकांचा नवा अन्वयार्थ लावण्याचा लक्षणीय प्रयत्न केला आहे. अशी ही महाभारताच्या विशाल पटलावर साकार झालेली कादंबरी महत्त्वपूर्ण ठरली आहे.

### ३) 'पर्व' मधील वातावरणनिर्मिती

कादंबरीचा महत्त्वाचा घटक म्हणजे कादंबरीची वातावरण निर्मिती हा असतो. महाभारतकालीन वातावरण निर्माण करण्याची हतोटी 'पर्व' मध्ये भैरप्पा यांनी वापरली आहे. कथानक आणि वातावरण यांची योग्य सांगड घालून लेखकाने वाचकाला पौराणिक काळात घेऊन जाण्याचे आणि त्यांच्यासमोर पट उभा करण्याचे कौशल्य वापरले आहे. महाभारतकालीन संपूर्ण प्रदेश 'पर्व' मध्ये साकारला आहे. तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक आणि भौगोलिक वैशिष्ट्यांसह अनेक वर्णने भैरप्पांनी चित्रित केलेली आहेत. त्यामुळे कादंबरीतील वातावरणामध्येच एक प्रकारची वास्तवता अनुभवास येते.

भैरप्पांनी साकार केलेले वातावरणाचे चित्र हे प्रत्येक ठिकाणी सरस ठरले आहे.

मूळ महाभारत कथे इतकेच बारकावे टिपण्यात भैरप्पा यशस्वी झालेले आहेत. मग ती हस्तिनावती असो, इंद्रप्रस्त असो, अज्ञातवास असो, द्वारकेचे चित्र असो किंवा युद्धाचं वर्णन असो हे सर्व वाचताना भैरप्पा वाचकाला कितीतरी वर्ष मागे घेऊन जातात. तेवढे सामर्थ्य त्यांच्या शैलीमध्ये पहावयास मिळते. आपणही त्यातीलच एक व्यक्ती आहोत असा अनुभव कादंबरी वाचताना येतो. भैरप्पांचा वातावरण निर्मितीच्या सामर्थ्यावरच वाचकांना गुंतवून ठेवण्याचा एक गुण या ठिकाणी दृष्टीस पडतो.

'पर्व' कादंबरी मध्ये अनेक ठिकाणी आलेले वर्णन हे अत्यंत कलात्मकतेने साकार केले आहे. वातावरणच बहुधा प्रसंगाची, परिस्थितीची जाणीव करून देत असते. दुसऱ्या भागामध्ये सुरूवातीलाच वातावरणाची चाहुल लागते, ''हस्तिनावतीच्या पूर्वेला नदीच्या काठावर विदूराचं घर होतं, घरचा प्रमुख दरवाजा पूर्व दिशेलाच होता. दरवाज्या पुटं बांधलेले नीटसं, विशाल अंगण, तिथून तीसेक पायऱ्या उतरून गेल्यावर गंगा नदीच पात्र, त्या खळखळ वाहणाऱ्या नदीच्या काठावर घटकान घटका बसून राहण ही कुंतीची नेहमीची सवय पाण्यवरचं प्रेम, की वेळ काढण्याचा चाळा, कोण जाणे !'' [१३]

भैरप्पांनी प्रसंग उभा करण्याअगोदर योग्य पद्धतीने वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. ''संध्याकाळच्या वेळी समुद्रकिनारी फिरताना सतत वाहणारं वारं अंगावरचा घामाचा चिकटपणा पूर्णपणे थांबून टाकत नसलं, तरी निदान काही क्षण तरी घामाच्या नरकवासातून सुटका करत त्यातच लाटांचा आवाज त्यामुळे द्वारकेच्या लोकांच्या मनात वारा आणि लाटांचं नातं जुळून गेलं होते. समुद्राच्या लाटा पाहण्यासाठी समुद्रकिनारी जाण्याची किंवा तिथं वाळूवर बसून राहण्याची आवश्यकता नव्हती. घरात झोपून डोळे मिटून घेतले, तर लाटांचा घनगंभीर आवाज कानात घुमत होता. लाटा, वारा, उकाडा आणि घाम एकमेकांत मिसळून किंवा एकातून दुसरा असे निर्माण होत होते. गावापासून दिवसभराच्या प्रवासाच्या अंतरावर रैवतक पर्वत चढून गेलं की, दूरवर पसरलेलं समुद्राचं पाणी, थंडगार हवा आणि मुख्य म्हणजे सतत अंग चिकट करणाऱ्या घामापासून सुटका.''[१४]

या वर्णनावरून समुद्र, द्वारका, असहाय्य होणारा उकाडा स्पष्ट होत जातो. अनेक घटना प्रसंगांना वातावरणामुळे जीवंतपणा प्राप्त झालेला आहे. युद्धाची तयारी, युद्धाचे चित्रण, अशा कितीतरी घटना प्रसंगांना सूक्ष्मपणे तपशीलवार मांडता आल्या आहेत. ते वातावरण निर्मितीमुळेच शक्य झाले आहे.

### ४) 'पर्व' मधील घटना प्रसंग

'पर्व' कादंबरीमधील घटना प्रसंगामुळे कादंबरीचे स्वरूप नाटयमय बनले आहे. प्रसंग उभा करताना मोठया ताकदीने उभे केले आहेत. मूळ महाभारत कथेमध्येही व्यासांनी अशाच पद्धतीने प्रसंग निर्माण केलेले आहेत. त्याच पार्श्वभूमीवर 'पर्व' साकार झालेली आहे. महाभारत कथा असंख्य पात्रांनी नटलेली आहे. प्रत्येकाचे स्वभावधर्म वेगळे असूनही प्रसंग निर्माण करतानाही भैरप्पांनी मोठे कौशल्य वापरले आहे.

'पर्व' चे कथानक पाहिले असता घटना प्रसंगाच्या बाबतीत फ्लॅश - बॅक पद्धतीच्या तंत्राचा अवलंब केला आहे. कादंबरीतील प्रत्येक घटना आणि व्यक्तिरेखा मनोविश्लेषण पद्धतीने पुढे सरकताना दिसतात. प्रत्येक प्रसंग 'पर्व' मध्ये अत्यंत प्रभावीपणे मांडलेले आहेत याची स्पष्ट जाणीव होते.

### ५) 'पर्व' मधील संवाद

भैरप्पा यांनी कादंबरीमध्ये व्यक्तिरेखांच्या तोंडी घातलेले संवाद हे कादंबरीला जीवंतपणा आणतात. हेच संवाद वाचकांच्या मनाच ठाव घेताना दिसतात. व्यक्तिरेखांच्या मनातील भावभावना संवादामधूनच व्यक्त झाल्या आहेत. त्यामधील काही संवाद आपल्याला पाहता येतील.

कुंती आणि माद्री यांच्यामधील संवाद हा पूर्ण प्रसंगाची कल्पना देताना दिसून येतो.

''दया कसली?' मी स्वत:लाच म्हटलं आणि न राहून विचारलं, 'रजस्वला झालीस म्हणे!''

“मग काय करू?’ माझ्या नजरेत नजरं मिसळून ती म्हणाली, ‘तू नाही का होत? तशीच”[१५]

हा प्रसंग कुंती आणि माद्री यांचे दु:ख एकच आहे. हे स्पष्ट करताना अगदी नेमक्या शब्दात भैरप्पांनी मांडला आहे. द्युत सभेत द्रौपदीला घेऊन आल्यानंतर तिची कौरवांनी केलेली अवहेलना या प्रसंगाचे संवादही तितकेच समर्पक ठरले आहेत.

कृष्णाने नरकासूराच्या ताब्यात असणाऱ्या स्त्रियांना सोडवून आणल्यानंतर स्वत: त्यांच्याशी विवाह केला. त्यातल्याच एकीशी युयुधानाने केलेला संवाद,

‘तुझं नाव काय?”

‘धृती’

‘कुणी ठेवल हे नाव?’

‘कुणी म्हणजे? बाळाचं नाव कोण ठेवतं? आई - वडील, आजी आजोबा यांनी....’

‘कोण होते ते?’

‘अहो ! आमचा सिंधू देश शेतकऱ्याचं घराणं चांगली सुपीक जमीन होती......’

‘नरकासुराच्या तावडीत कशी सापडलीस?’

‘लग्न झालं, नवरा आणि त्याच्या घरचे मोठ्या थाटामाटात मला आपल्या घरी घेऊन चालले होते, या दरोडेखोरांनी चढाई केली होती. आमच्या माणसांच्या हातातही काठ्या - कोयते होते. पण दरोडेखोरांबरोबर लढताना ती शस्त्र कशी पुरशी ठरणार? शिवाय आमच्या कडची माणसही त्यांच्या तुलनेनं कमीच होती. कोवळ्या तरूण मुलीच्या केसालाही धक्का न लावता त्यांनी झटापट केली मी आणि इतर दोघी त्यांच्या तावडीत सापडलो. इतरांना ठार केलं त्यांनी, सोनं, तांब, दागदागीण्यासह आम्हाला घेऊन गेले.”[१६]

या संवादामधून संवादाची कुशलता आणि नरकासूराच्या क्रुरपणाचा आपल्यला प्रत्यय येतो.

कर्ण आणि कुंती यांच्या भेटीच्या प्रसंगावेळी जे संवाद भैरप्पांनी वापरले आहेत

ते पराकोटीला पोहचवणारे ठरले आहेत. कर्ण आणि कुंती यांच्या मनाचा हे संवाद वेध घेतात. संवाद वाचत असताना 'पर्व' मधील व्यक्तिरेखाच जणू आपल्याशी हितगुज करत आहेत अशी वाचकांच्या मनामध्ये भावना निर्माण होते.

## ६) 'पर्व' ची निवेदनशैली

'पर्व' कादंबरीमध्ये महाभारत कथेला नवे अन्वयार्थ हे वास्तव उलगडून दाखविण्याच्या भूमिकेवरून दिले आहेत. कोणत्याही कलाकृतीमध्ये निवेदनपद्धती ही अतिशय, महत्त्वाची असते. तिचा मोलाचा वाटा असतो. निवेदन पद्धतीच्याद्वारे भैरप्पांनी विविध प्रसंगाची मांडणी हळूवारपणे केलेली आहे.

'पर्व' मध्ये आत्मनिवेदनाचे तंत्र वापरले आहे. कारण हे तंत्र कथावस्तूला जवळ करणारे असल्यामुळे व्यक्तिरेखा या वाचकांशी थेट हितगुज करत आहेत. अशी कादंबरीची रचना आढळून येते.

व्यक्तिमनाचा मानसशास्त्रीय पद्धतीने भैरप्पांनी वेध घेतलेला आहे. 'पर्व' मधील व्यक्ती आपल्या गतजीवनातील घटना, दुःख उगाळत बसल्या सारख्या वाटतात. पण त्याचबरोबर आत्मनिवेदनाचे तंत्र मात्र त्या सोडताना दिसत नाहीत. फ्लॅश बॅक पद्धतीने कादंबरी साकारलेली पहावयास मिळते.

निवेदनाचे सूत्र हाती ठेवून प्रत्यक्ष घटना न सांगता निवेदनाद्वारे व्यक्तिमनातील विचार, व्यक्तीचे वर्तन, त्यांच्या भावभावना, क्रिया - प्रतिक्रिया आणि मानसिक संघर्ष प्रभावीपणे लेखक साकार करतो आहे. म्हणूनच 'पर्व' मधील व्यक्ती वाचकांच्या मनाचा ठाव घेतात. ते म्हणजे निवेदन पद्धतीच्या आधारे हे स्पष्ट होते.

## समारोप

भैरप्पा यांनी लिहिलेली 'पर्व' ही कादंबरी आशयाच्या आणि विषयाच्या दृष्टिने पूर्णपणे वेगळी ठरलेली कादंबरी आहे. परंपरागत निर्माण झालेल्या आशयसूत्राला वेगळे करून वास्तवाचे आयाम कादंबरीत उतरताना दिसतात. कादंबरीमध्ये अनेक गोष्टीचे वेगळेपण सिद्ध झाले आहे. अनेक घटना - प्रसंगावर प्रकाश न टाकता 'पर्व' पुढे सरकताना दिसून येते. लेखकाने तत्काळाशी समकालीन होऊन त्या काळाचे चित्रण करण्याचा प्रयत्न भैरप्पांनी केलेला आहे. महाभारतकालीन जीवनपद्धती, समाजपद्धती, विवाहपद्धती, आचार - विचार इ. सूक्ष्मपणे टिपण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.

मराठी पौराणिक कथानकाच्या आधारे दोन प्रवृत्तीच्या कादंबऱ्या लिहिल्या जातात. पुराण कथातील व्यक्तिरेखांना समकालीन वास्तवाचा संदर्भ देऊन लिहिलेल्या प्राचीन आर्य संस्कृतीचे उदात्तीकरण करणाऱ्या या दोन्ही प्रकारांपेक्षा 'पर्व' पूर्णतः वेगळी ठरलेली कादंबरी आहे. भूतकालीन अद्‌भुतता, परंपरादिव्य पुजक वृत्ती, रमणीयता यांना फाटा देऊन तत्कालीन व्यक्तिरेखांचे पाय जमीनीवर ठेवून 'पर्व' साकार झालेली दिसते.

वेगवेगळे दृष्टिकोन समोर ठेवून साकार झालेली 'पर्व' कादंबरीने मराठी वाचकांना एक नवा मार्ग दाखविला आहे. या कादंबरीचे सर्वात मोठे वेगळेपण म्हणजे ऐतिहासिक वास्तवता हे म्हणावे लागेल. नैतिक समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून भैरप्पा यांनी महाभारताचे आकलन केले आहे हे या ठिकाणी स्पष्ट होते.

मिथक आणि महाभारत यांचा संबंध अगदी जवळचा आहे. याच मिथकांना वास्तवतेच्या एका विशिष्ट पातळीवर रेखाटण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न भैरप्पांनी केला आहे. हे प्रस्तुत प्रकरणाच्या आधारे स्पष्ट होते.

## संदर्भ सूची :


१. भैरप्पा, एस. एल. : 'पर्व' (भावानुवाद : कुलकर्णी, उमा) मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, आवृत्ती पाचवी, २००६ पुनर्मुद्रण २००७ पृ. ६७९.

२. तत्रैव : पृ. ५९.

३. ठाकूर, रवींद्र : 'कर्णकथेचा सामाजिक अन्वयार्थ' (संपा : शहा, मुं. बाः मिथक आणि मराठी साहित्य), का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था धुळे, आवृत्ती पहिली २००३, पृ. १४०.

४. भैरप्पा, एस. एल. : 'पर्व' (भावानुवाद : कुलकर्णी, उमा) मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, आवृत्ती पाचवी, २००६ पुनर्मुद्रण २००७, पृ. ६४.

५. दादेगावकर, पद्माकर : 'चर्चासत्र', पंचधारा (संपा : साधले, नलिनी ), एप्रिल - सप्टेंबर १९९२ पृ. ७८.

६. तुकदेव, रोहिणी : 'चर्चासत्र', पंचधारा (संपा : साधले, नलिनी ), एप्रिल - सप्टेंबर १९९२ पृ. ९३.

७. सहस्रबुद्धे, सुप्रिया : 'महाभारत आणि पर्व' (संपा : टिळक, विद्यागौरी, शहा, मृणालिनी : भैरप्पाचे कादंबरी विश्व), चंद्रकला प्रकाशन पुणे, आवृत्ती पहिली २००७ पृ. ९९.

८. भैरप्पा, एस. एल. : 'पर्व' (भावानुवाद : कुलकर्णी, उमा) मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, आवृत्ती पाचवी, २००६ पुनर्मुद्रण २००७) पृ. ७८८.

९. तत्रैव : पृ. ५४५.

१०. तत्रैव : पृ. ६४१.

११. तत्रैव : पृ. ६७.

१२. सहस्त्रबुद्धे, सुप्रिया : 'महाभारत आणि पर्व' (संपा : टिळक, विद्यागौरी ; शहा, मृणालिनी : भैरप्पाचे कादंबरी विश्व), चंद्रकला प्रकाशन पुणे, आवृत्ती पहिली २००७ पृ. ९४.

१३. भैरप्पा, एस. एल. : 'पर्व' (भावानुवाद : कुलकर्णी, उमा) मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, आवृत्ती पाचवी, २००६ पुनर्मुद्रण २००७) पृ. ३७.

१४. तत्रैव : पृ. ९३.

१५. तत्रैव : पृ. ४५.

१६. तत्रैव : पृ. ३५३.